# कोपरी वाहतूक उपविभाग हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २७५ /२०२४ दि. २३/१०/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात **कोपरी** वाहतूक उपविभागाच्या हद्दीत जे.व्ही. कंपनीकडुन रेल्वे यार्ड कोपरी सर्कल ते सारस्वत बँक दरम्यान वळण रस्त्यावर पिलर क्रमांक **PK7-PK8** लॉचिंग गर्डर ३५० केन डिस्मेंटलिंगचे काम दिनांक २३/१०/२०२४ रोजी ते दिनांक ३०/१०/२०२४ रोजी पावेतो रात्रौ ११:०० ते सकाळी ०४:०० वाजेपावेतो करण्यात येणार आहे. सदर काम करते वेळी भास्कर कट ते कोपरी सर्कल वाहिनीवरील संपूर्ण वाहतूक पूर्णपणे बंद करावी लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) भास्कर कट येथून ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **भास्कर कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने कोपरी सर्कल ते भास्कर कट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) तीन हात नाका व टेलिफोन नाका येथून भास्कर कट मार्गे कोपरी सर्कल येथून ठाणे रेल्वे स्टेशन पुर्वेकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **भास्कर कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर जड अवजड वाहने, खाजगी बसेस कोपरी सर्कल ते भास्कर कट वाहिनीवरून इच्छित स्थळी जातील. तसेच हलकी वाहने शेठ लक्ष्मीचंद फकीचंद प्रसूतीगृह बारा बंगला मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दिनांक २३/१०/२०२४ रोजी ते दिनांक ३०/१०/२०२४ रोजी पावेतो रात्रौ ११:०० ते सकाळी ०४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी** :—
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई—विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner



working location
कामाचे ठिकाण
Road closed
TW
Road closed
TW
Road closed
TW
DHANESHWAR MAHADEO MANDIR
BAM AUTO MOB
SHIDHARTH NAGAR
CO.OP.HSG. SOCIETY G+8
MAYUR SHASKIYA NIYOJAN
ICICI BANK
G+20
5620
3569
4872
4863
VIJAYSPI
AMARJA G+2
SHIPRA BUILDING G+2
MDHUBAN BUILDING
BUILDING
BUS STOP
SWAMI VIVEKANAND CHOWK
BUS STOP
to 12 Bongle
TOILET
SHOP
9641
P13
P11
P12
OF EXP. JT
5316
5703
6493
5840
5763
Kopri circle
कोपरी सर्कल
Barricades (Road closed)
working location
Traffic Diversion
Traffic warden
sign boards
Bara Bunglow
बारा बंगला